# अजब तेरा क़ानून देखा

## विजु कुलकर्णी यांनी गायलेली

**ध्रुवपद :**

हे खुदा, मी पाहिले आहे की

तुझे कायदे कसे अजब, कसे रहस्यमय आहेत!

तुझ्या रीतीनीती किती विस्मयकारी आहेत!

जिथे कुठे मी मन लावले,

ज्या कुणाला माझे प्रेम दिले,

तिथे मी पुन्हापुन्हा तुलाच प्राप्त केले आहे.

**पद १ :**

ना कोणी तुला मंदिरात प्राप्त करू शकतो,

ना तू कधी मशीदीत सापडतोस.

कारण हे खुदा, तुला तर केवळ

एका खऱ्या आणि प्रामाणिक साधकाच्या हृदयातच जाणता येते,

त्याच हृदयात जाणता येऊ शकते जे उत्कंठेने स्पंदित होत असेल.

**पद २ :**

आणि एकदा का हे हृदय तुझ्यावर फिदा झाले,

आणि स्वतःला संपूर्णतेने तुझ्या हवाली करून,

त्याने तुझ्यासमोर समर्पण केले,

की, तू तुझ्या प्रेमाची संपूर्ण तेजस्विता दाखवून देतोस.

**पद ३ :**

हे खुदा,

एकदा का कोणी तुझ्या विशुद्ध स्वरूपाचा ‘आशिक़’ म्हणजेच प्रेमी झाला,

की मग तो त्याच रंगात रंगून जातो, ज्या रंगात तू त्याला रंगवलेले असते.

**पद ४ :**

ज्यांच्या हृदयात तसुभरदेखील

जीवभाव जर उरला,

तर ते वाट हरवून बसतात.

जे स्वतःच्या अहंकाराचा व स्वतः पृथक असल्याच्या भावाचा त्याग करतात,

केवळ तेच तुला भेटतील आणि तुझे होऊन जातील.

**पद ५ :**

ज्यांचा तुझ्यावर विश्वास आहे, हे खुदा,

ते तुझे दर्शन अशा रीतीने घेतात आणि अशा प्रकारे त्याला हृदयात जतन करून ठेवतात,

की, एखाद्या भिकाऱ्याच्या हाती जणू

एखादा अद्वितीय व अनमोल मोती लागावा.

इंग्रजी भावार्थ : ईशा सरदेसाई

# परिचय : ईशा सरदेसाई

भारतामध्ये गेली अनेक शतके, महान कवींनी भगवंताप्रति असलेले त्यांचे प्रेम 'कव्वाली'च्या रूपात व्यक्त केले आहे. या 'कव्वाल्या' म्हणजे ती भक्तीगीते आहेत, ज्यांचा आरंभ सूफी परंपरेत झाला. या 'कव्वाल्या' हिंदी, उर्दू, अरबी, पंजाबी किंवा फारसी भाषांमधून किंवा या भाषांचे मिश्रण करून गायल्या जातात आणि त्या, निःसंशयपणे प्रेमभावनेच्या सर्वाधिक मनमोहक आणि आंतरिक मस्तीने पूरित करणाऱ्या अभिव्यक्तींपैकी एक असतात.

'कव्वाली' एकाच वेळी हृदयस्पर्शी आणि आनंदपूर्णही असते. तिच्या स्वरांमध्ये इतकी सौम्यता असते, इतकी व्याकूळ उत्कंठा असते की, ती एकाएकी तुमच्या हृदयीच्या तारांना छेडते. त्याचवेळी तिचे संगीत विस्तृत होण्याची, स्वातंत्र्याची आणि असीम विकासाची भावना व्यक्त करते. 'कव्वाली'मध्ये संपूर्ण उन्मुक्तता असते.

ज्या सभांमध्ये किंवा जलशांमध्ये परंपरागत पद्धतीने 'कव्वाल्या' सादर केल्या जातात त्यांना 'महफ़िल-ए-समा' म्हटले जाते. 'महफिल' म्हणजे 'सभा किंवा जलसा' आणि 'समा', एकत्र येण्याच्या त्या सूफी प्रथेला म्हटले जाते ज्यांमध्ये विशेषतः आध्यात्मिक धार्मिक संगीताचे गायन सादर केले जाते.

'कव्वाली'च्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांकडून मी असे ऐकले आहे की, या जलशांना तोडच नसते. 'कव्वाली' सादर करणाऱ्या गायकाचा आवाज जेव्हा वातावरणात गिरक्या घेत असतो, तबल्याची किंवा ढोलकीची थाप जेव्हा लोकांच्या हृदयाच्या ठोक्यांशी मेळ साधत असते, तेव्हा प्रेमाची, भक्तीची ऊर्जा खरोखरच त्या स्थळी प्रत्यक्ष तरंगू लागते. बहुतेक वेळी लोक उठून नृत्य करू लागतात. भगवंताची अनुभूती तत्काळ होते आणि ती स्पष्टपणे अनुभवतादेखील येऊ शकते.

श्रीगुरुमाईंना 'कव्वाली'चे गायन करणे आणि त्या ऐकणे खूप आवडते, कारण 'कव्वाल्या' जिवलगाप्रति, भगवंताप्रति गहन, अति गहन असे प्रेम व्यक्त करतात. 'अजब तेरा क़ानून देखा' या 'कव्वाली'ची निवड गुरुमाईंनी केली आहे आणि ती त्यांच्या संगीत लायब्ररीमधून घेण्यात आली आहे.

आम्हाला या 'कव्वाली'च्या लेखकाचे नाव माहिती नाही. तरीदेखील, जे शब्द त्यांनी आपल्याला दिले आहेत, जी रचना त्यांनी अनेक युगांपूर्वी लिहिली आहे, त्यामधून आपल्याला 'कव्वाली'च्या

रचनाकारासमवेत आपला एक स्नेहबंध जुळत असल्याची जाणीव होते, आणि भगवंताप्रति असलेल्या त्यांच्या प्रेमाची अनुभूती, आपणदेखील घेऊ शकतो.

ही ‘कव्वाली’ तिची मूळ भाषा — जी हिंदी आणि उर्दू भाषेचे मिश्रण आहे त्यात — खूपच सुंदर आहे, म्हणून गुरुमाईंनी विचार केला की, प्रत्येकाला ती ऐकायला आवडेल. श्रीगुरुमाईंच्या सांगण्यावरून, एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या एक स्टाफ सदस्या, विजु कुलकर्णी [ज्यांना सर्वजण ‘विजुताई’या नावाने ओळखतात] यांनी या ‘कव्वाली’ला, राग ‘पटदीप’च्या नव्या रूपात स्वरबद्ध केले आहे.

श्रीगुरुमाईंनी विजुताईंना विचारले की, त्यांनी याची संगीतरचना राग ‘पटदीप’मध्ये कशी काय केली. यावर विजुताई म्हणाल्या की, ही सेवा त्यांना जेव्हा प्राप्त झाली, तेव्हा त्यांनी स्वतःचे डोळे मिटून घेतले आणि ‘कव्वाली’ला प्रार्थना केली की, त्या ‘कव्वाली’ने त्यांना स्वतःची इच्छा सांगावी की, तिला कोणत्या रागात गायले जावे.

त्यानंतर विजुताईंनी गायला सुरुवात केली, त्या गात राहिल्या आणि गातच राहिल्या. गाता-गाता त्यांच्या लक्षात आले की, तो राग होता : राग ‘पटदीप’. हा राग प्रेमाच्या आणि व्याकूळतेच्या गुणांना जागृत करतो — ती व्याकूळता, जी जिवलगाच्या वियोगामुळे निर्माण होते; हा वियोग संपवण्याच्या उत्कट इच्छेतून निर्माण होते. विजुताईंनी सांगितले की, हा राग बालवयापासून त्यांना अतिशय प्रिय आहे. या रागात स्वरबद्ध केलेली गीते आतुरतेने ऐकल्याच्या अनेक भावरम्य आठवणी त्यांच्यापाशी आहेत.

विजुताई म्हणतात, “या रागाची अनोखी धून मला अतिशय प्रिय आहे. ती माझ्या हृदयाला मोहून टाकते. जेव्हा-जेव्हा हा राग मी ऐकते किंवा गाते, तेव्हा-तेव्हा तो मला आनंदित करतो.”

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.